Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**March -2022**

ISSUE No- (CCCXLIII) 343

## INDIAN WOMEN: PRESENT, PAST AND FUTURE



**Prof. Virag S. Gawande**
**Chief Editor**
Director
A.S.R.&,D. T.I.,Amravati.

**Dr. D.V. Meshram,**
Chief organizer:
I/C Principal

**Dr. B.V. Kendre,**
IQAC Coordinator
& Head Dept. of Chemistry

**Dr. Babasaheb Shep**
**Editors**
Head of History Department

**Dr. Ramesh Rathod,**
**Editors**
Head, Department of Sociology

**Dr. V. B. Gaikwad**
**Editors**
Department of Zoology

Vaidyanath College of Arts,Science & Commerce, Parli-Vaijnath

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Scanned by CamScanner

Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2022

ISSUE No- (CCCXLIII) 343

## INDIAN WOMEN: PRESENT, PAST AND FUTURE



**Prof. Virag S. Gawande**
**Chief Editor**
Director
A.S.R.&,D. T.I.,Amravati.

**Dr. D.V. Meshram**
Chief organizer
I/C Principal

**Dr. B.V. Kendre,**
IQAC Coordinator
& Head Dept. of Chemistry

**Dr. Babasaheb Shep**
**Editors**
Head of History Department

**Dr. Ramesh Rathod,**
**Editors**
Head, Department of Sociology

**Dr. V. B. Gaikwad**
**Editors**
Department of Zoology

Vaidyanath College of Arts,Science & Commerce, Parli-Vaijnath

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com* Aadhar Publications

Scanned by CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 343 (CCCXXXVIII)
ISSN : 2278-9308
March, 2022

# INDEX



| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | जागतिक राजकारणात महिला सहभाग | प्रा. डॉ.बापुराव वि.आंधळे | 1 |
| 2 | हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील महिलांचे योगदान | बांगर स्वाती आदिनाथ | 4 |
| 3 | असंघटित क्षेत्रातील महिलांचे सबलीकरण-एक अभ्यास | प्रा. डॉ. आंबादास पांडुरंग बर्वे | 8 |
| 4 | भारतीय राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रिया | डॉ. बावलगावे सी. एम. | 13 |
| 5 | संततिनियमन चळवळीतील पहिल्या शिलेदार : मालतीबाई कर्वे | डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | 17 |
| 6 | भारतीय स्त्रियांची सुरक्षा आणि दलित चळवळ | डॉ. किरण चक्रे | 22 |
| 7 | ग्रामीण भागातील स्त्रियांच्या समस्या | आबासाहेब माणिकराव देशमुख | 25 |
| 8 | पंडिता रमाबाई : प्रागतिक भूमिका व कार्य | प्रा. एम.पी.देशपांडे | 28 |
| 9 | आर्थिक सामाजिक समावेशनाचा स्त्रियांच्या सशक्तीकरणातील योगदान | डिके विनोद रमेश | 33 |
| 10 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग | डॉ. गंगणे अमोल उत्तमराव | 39 |
| 11 | भारतीय क्रांतीकारकांच्या चळवळी आणि स्त्रियांचे योगदान | प्रा. डॉ. जाधवर बी.डी. | 42 |
| 12 | भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीकारी स्त्रियांचे योगदान | प्रा.डॉ.कदम मोतीराम विठ्ठलराव | 45 |
| 13 | बौध्द संघातील स्त्रियांचे योगदान : एक अभ्यास | प्रा. डॉ.रामभाऊ देवराव काशीद | 50 |
| 14 | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक कार्य | डॉ. सतीश खरात | 53 |
| 15 | स्त्रीवादी साहित्य कादंबरी (१८५० ते १९५०) एक ऐतिहासिक दृष्टिक्षेप. | प्रा. श्री. अमोल अरूण कुंभार | 56 |
| 16 | शिलाहारकालीन जैन धर्मिय स्त्रियांची कामगिरी | कु. वनिता गंपू कुंभार | 61 |
| 17 | प्राचीन, मध्ययुगीन,आधुनिक स्त्रीजिवन एक अभ्यास | प्रा. डॉ. सौ. एस. पी. लाखे | 64 |
| 18 | कोरोना महामारीचा महिलांच्या जीवनावर झालेला दूरगामी परिणाम | चित्रा भारत पगारे /डॉ. जयश्री महाजन | 71 |
| 19 | सातवाहन नृपती हाल संपादित गाहासत्तसई (गाथासप्तशती)तील स्त्रीजीवन | प्रा. डॉ.माधवी महाके /श्रीमाला के.जी | 76 |
| 20 | जागतिकीकरण आणि भारतीय स्त्री : एक सामाजिक दृष्टीकोन | डॉ. गजानन रा. मुधोळकर | 82 |





Scanned by CamScanner

**B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal**
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 343(CCCXLIII)
ISSN : 2278-9308
March, 2022

# संतति नियमन चळवळीतील पहिल्या शिलेदार : मालतीबाई कर्वे

डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार
इतिहास विभाग प्रमुख, महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर

विसाव्या शतकाच्या प्रारंभीभारतातच नव्हे तर संबंध आशिया खंडात संततिनियमन चळवळ सुरु करण्याचे श्रेय रघुनाथ धोंडो कर्वे अर्थात र.धों कर्वे यांना जाते. र.धों.नी पाश्चात्य ज्ञान, भारतातील लोकस्थिती, समाजजीवन, आणि त्यांनी वैयक्तिक स्वरुपात घेतलेले अनुभव यातून संततिनियमन चळवळीला भारतात सुरुवात केली. इ.स.१९२१ मध्ये संततिनियमन या विषयावर इंग्रजी भाषेतून एक पुस्तक लिहून त्यातून हा विचार समाजापर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न सुरु केला. जगाच्या इतिहासाचा विचार केला तर कित्येक प्रगत म्हणवल्या जाणा-या राष्ट्रांमध्येही ही चळवळ अथवा हा संततिनियमनाचा विचार प्रसारित झाला नव्हता. जवळपास र.धों.च्या समकाळातच हा विचार इंग्लंड व अमेरिकेतही विकसित होत होता, मात्र त्याच्या प्रचार प्रसाराची गती भारताप्रमाणेच होती. इंग्लंडमध्ये १९२१ मध्ये मारी स्टोप्स यांनी तर अमेरिकेत थोडे आधी म्हणजे इ.स.१९१६ मध्येमागरिट सेंगर यांनी या कार्याला सुरुवात केली होती. यावरून असे म्हणता येईल की, तत्कालात प्रगत मानल्या जाणा-या राष्ट्रांच्या बरोबरीने भारताला न्यावयाचे काम संततिनियमन विषयक विचार व कार्याच्या प्रचार प्रसारातून र.धों आणि त्यांच्या पत्नी मालतीबाई यांनी केले होते.

र.धों.कर्वेनी संततिनियमनया विषयावरील इंग्रजी भाषेतील पुस्तकाचे 'संततिनियमन : विचार व आचार' असे भाषांतर करून ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचवण्याचे काम केले. या संदर्भात त्यांच्या कार्यात सहकार्य करणा-या र.धों.च्या विचाराच्या पुरस्कर्त्या शकुंतला परांजपे यांनी म्हटले आहे की, '१९२१ सालीच त्याने ह्या विषयावर इंग्रजीत एक लहानशी पुस्तिका लिहून सर्वाना वाटली.जवळची पुंजीही ह्या कार्यात कमी आली. ह्या विषयावरची सर्व पुस्तकी वाचून आणि साधनांचा अभ्यास करून स्वारीने परदेशातून ती साधने मागवली.आपल्या राहत्या घरीच लोकांना साधने बसवून देण्याचा उपक्रम सुरु केला. (परांजपे:१९८८:१०२) र.धों.नी भारतात हे कार्य सुरु केले तेंव्हा सबंध आशिया खंडात अशा प्रकारचे कार्य अथवा विचार कुणी स्वीकारलेले नव्हते म्हणून र.धों. ख-या अर्थाने आशिया खंडातील संततिनियमन चळवळीचे आद्य प्रवर्तक ठरतात.र.धों.चे व्यक्तिमत्व म्हणजे तत्कालीन सुधारणा चळवळ आणि सुधारणेचे विविध प्रवाह यांना छेद देणारे व्यक्तिमत्व होय. संततिनियमन या विषयाच्या माध्यमातून त्यांनी हा भारतीय समाजसुधारणा चळवळीत नवा असणारा आणि काळाच्या पुढे जाणारा विचार होता. त्यामुळे त्यांना या कार्याबद्दल आर्थिक ताण तणाव तर सहन करावाच लागला पण यापलीकडे जाऊन र.धो. आपल्या अंगीकृत कार्यामुळे व समाजसुधारणेच्या घेतलेल्या ध्यासामुळे सामाजिक हेटाळणीचा विषय ठरले. परंतु त्यांचे हे विचार व कार्य स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताला किंबहुना संपूर्ण विश्वाला स्वीकारावेच लागले. त्यांच्या या संततिनियमन चळवळीच्या कार्यात त्यांना संपूर्ण स्तरावरून टीका सहन करावी लागत असताना एका व्यक्तीने मात्र त्यांना आपले आयुष्य पणाला लावून या कार्यात त्यांना शेवटपर्यंत सहकार्य केले ती व्यक्ती म्हणजे त्यांची पत्नी मालतीबाई कर्वे.

र.धों.चा संततिनियमनविषयक विचार हा केवळ लोकसंख्या वाढीवरील उपाय म्हणून पुढे आला नव्हता. तर यापाठीमागे व्यापक असा, स्त्रियांची स्थिती सुधारण्याचा, सामाजिक स्थिती सुधारण्याचा व त्याबरोबरच स्त्री स्वातंत्र्याचा विचार होता. र.धों.चा विचार म्हणजे अलीकडच्या काळातील स्त्रीवाद या संकल्पनेच्या स्वरुपात पुढे आलेला विचार होय. संततिनियमनाच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याचा मूलगामी विचारत्यांनी लोकांपर्यंत



Scanned by CamScanner

पोहचवण्याचे काम केले. या कामात मालतीबाई यांचे योगदान अमुल्य असे आहे. किंबहुना मालतीबाई यांनी र.धों.च्या कार्यात कायम सहकार्य केले. महात्मा फुले यांच्या समाजसुधारणा कार्यात ज्याप्रमाणे सावित्रीबाई यांचे योगदान होते त्याप्रमाणेच मालतीबाई यांची ही भूमिका समजावून घ्यावी लागेल तरच मालतीबाई यांनी दिलेल्या योगदानाचे मोठेपण कळेल.

मालतीबाई यांच्या पूर्व आयुष्यासंदर्भात फारसी माहिती आढळत नाही. र.धों. कर्वे यांच्या आयुष्यात विवाहाच्या माध्यमातून जोडीदार म्हणून आल्यानंतरचे बरेचसे संदर्भ उपलब्ध आहेत. त्यांचे लग्न त्यावेळच्या प्रथेप्रमाणे बालवयात न होता प्रौढ वयात झाले होते यासंदर्भात महर्षी कर्वे यांनी आपल्या आत्मवृत्तात म्हटले आहे की, 'रघुनाथ स्वावलंबी झाल्याबरोबर मी हा प्रश्न त्याच्याजवळ कढीला; परंतु आणखी काही वर्षे तशीच जाऊ दिले म्हणजे त्याच्या मनात असल्यामुळे मी त्याला आग्रह केला नाही. पुढे एकोणतिसाव्या वर्षी त्याचे लग्न झाले व त्याला या कामी मी योग्य ती मदत केली.'(कर्वे धों.के: १९५८:३०४) या विवाहासाठी र.धों.नीच स्वत: आपल्या जोडीदारची निवड केली होती. विवाहापूर्वीच या दोघांची ओळख होती. र.धों.चे बंधू शंकरराव कर्वे यांनी तर त्यांचा प्रेमविवाह होता आणि मी त्याला साक्षी होतो असे म्हटले आहे. र.धों.च्या पत्नी मालतीबाई यांचे पूर्वाश्रमीचे नाव गंगू गोडे असे होते. त्या आपल्या रंगू आणि बनू या मोठ्या बहिणीबरोबर हिंगणे येथे आश्रमात शिक्षणसाठी आल्या होत्या. यासंदर्भात भास्करराव कर्वे यांनी म्हटले आहे की,'हिंगणे येथे आश्रमात गोडे मुली होत्या. थोरली विधवा होती.तिला नुकत्याच सुरु झालेल्या अनाथ बालीकाश्रमात पाठवले तर कोकणात खालच्या मुलींचे लग्न जमविण्यास पंचाईत पडेल, म्हणून लहान दोन कुमारिका मुलींना घेण्याच्या वडिलांच्या अटीवर अण्णांनी त्या तीन मुलींना इ.स.१९०० मध्ये संस्थेत प्रवेश दिला.' (देशमुख अनंत:२०१०:६२) पुढे गंगूचे शिक्षण आश्रमात राहूनच पूर्ण झाले.त्यामुळे या दोघांची लग्नापूर्वीच ओळख होती.म्हणूनच शंकरराव कर्वेनी या दोघांच्या विवाहाला प्रेमविवाह असे म्हटले आहे.

मालतीबाई आणि र.धों. यांचा विवाह कसा ठरला या संदर्भातला इतिहास शंकररावांनी सांगितला आहे. 'इ.स.१९०९ साली आम्ही सर्व कर्वे मंडळी आणि गंगू (मालती) व रंगू या बहिणी मुरुडास गेलो होतो.या बहिणी आश्रमात राहत आणि त्याचे गाव मुरुडजवळ होते, जाताना आगबोटीने गेलो पण येताना गाडीवाटे म्हणजे दापोली, महाड, महाबळेश्वर असे बैलगाडीतून आलो. दिवसा मुक्काम आणि रात्री प्रवास, असा हा कार्यक्रम सहा-सात दिवस चालला होता. पहाटे आम्ही म्हणजे आण्णा, आप्पा रघुनाथ, मी, गंगू व रंगू चालत असू या प्रवासात गंगू आणि आप्पा यांचं जमलं आणि त्यांनी आण्णांना सांगितले. आण्णांनी गंगूच्या वड़िलांना लिहून त्यांची संमती मिळवली आणि हे लग्न ठरलं.' (देशमुख अनंत:२०१०:८५) हे लग्न दोघांच्याही संमतीने झाले होते.या वेळेला र.धों.चे वय एकोणतीस वर्षाचे होते तर मालतीबाई या एकेवीस वर्षाच्या होत्या. यावरून लक्षात येते की, दोघांनीही विचारपूर्वक एकमेकांना आपला जीवनसाथी म्हणून निवडले होते. लग्नापूर्वीची त्यांची ओळख होती, त्या ओळखीचे प्रेमात रुपांतर व प्रेमाचे विवाहरूपी सहजीवनात रुपांतर झाले होते. दोघांचेही विचार एकमेकांना पटले असावेत, म्हणूनच र.धो.नी संततिनियमन कार्याचा प्रचार सुरु केल्यानंतर त्यात मालतीबाईंनी मोलाची साथ दिली. मालतीबाई यांचे शिक्षणही फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रीव्हीयस पर्यंत झाले होते. यासंदर्भात त्यांचे बंधू भास्कररावानी लिहिले आहे की, 'गंगूताईचे शिक्षण प्रीव्हीयस पर्यंत झाले होते. त्याचा उपयोग त्यांना पुढे नोकरी करताना झाला. लग्नात त्यांचे नाव 'मालती' असे ठेवण्यात आले. तेच पुढे बाहेर वापरले गेले.'(देशमुख अनंत:२०१०:६३) अशा पद्धतीने त्यांचे लग्न पार पडून वैवाहिक जीवनाला सुरुवात झाली. पुढील जीवनात मालतीबाईंनी त्यांना मोलाची साथ दिली. म्हणूनच त्यांना स्वार्थत्याग करून संततिनियमनाच्या प्रचारकार्याला स्वत:ला वाहून घेता आले.



Scanned by CamScanner

लग्नानंतर त्यांनी आपले कुटुंब मुंबईतील गोरेगावात वसवले व आपली कर्मभूमी म्हणून मुंबईचीच त्यांनी निवड केली. त्यांच्या कार्यात मालतीबाईनीही अखेरच्या श्वासापर्यंत योग्य ती साथ दिली. मालतीबाईंच्या स्वभाव गुणांविषयी आण्णानी आपल्या आत्मवृत्तात वर्णन केले आहे. 'हल्ली ही मुंबई म्युनिसिपालीटीच्या मुलींच्या उर्दू शाळेत ड्रील टीचर (कवायत शिकवणे) काम करीत असते. हल्लीच्या पिढीत दिसून न येणारा, काटकपणा व चिकाटी हे गुण मालतीबाईमध्ये विशेष प्रमाणात आहेत. शाळेतले काम सांभाळून मुंबईतल्या कित्येक स्त्रियांच्या चळवळीत ती बरेच लक्ष घालीत असते व इतके करून घरातील कामकाज व टापटीप यात बिलकुल कमी पडू देत नाही.' (कर्वे धों.के: १९५८:३२८) या स्वभाव गुणांमध्येच मालतीबाई यांच्या कर्तृत्वाचे कौतुक आणि कर्वे कुटुंबाच्या समाजसुधारणेच्या कार्यात मालतीबाई समरूप झाल्याचेच वर्णन स्त्री शिक्षणासाठी आयुष्य वेचणारे सासरे महर्षी कर्वे यांनी केले आहे. र. धों.आणि मालतीबाई यांचा विवाह इ.स.१९११ मध्ये झाला होता. पुढील दहा वर्षाच्या काळात रधोंचे संततिनियमनाच्या प्रचार व प्रसाराचे कार्यक्षेत्र निश्चित झाले होते. त्यासाठी ते तत्कालीन मासिकांमध्ये लेखन करीत होते. या त्यांच्या लेखन कार्यास व आपल्या विचारांच्या प्रचार कार्यास तत्कालीन सनातनी वर्गाकडून विरोध होत होता त्यामुळेच त्यांना अनेकदा आपल्या नौकरीचा राजीनामा द्यावा लागला होता. र.धों.चा मानी स्वभाव आणि विचारांती स्वीकारलेले कार्य ते सोडावयास तयार नव्हते, प्रसंगी त्यांनी आपण करत असलेल्या नोक-या सोडल्या.

अशा कठीण प्रसंगात र.धों.च्या विचार व कार्याच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या राहिल्या त्या मालतीबाई. त्यांनी केवळ घरालाच नव्हे तर र.धों.च्या विचार आणि कार्यालाही आधार दिला. यासंदर्भात आण्णा लिहितात की, 'सांपत्तिकदृष्ट्या मालतीबाई रघुनाथाला बरीच मदत करू शकण्यासारखी असल्यामुळे दोन वेळा नोकरीचा राजीनामा देताना त्याचे मन कचरले नाही.'(कर्वे धों.के: १९५८:३२८) र. धों.चा हा स्वाभिमान आणि बुद्धिवादी विचार जिवंत ठेवण्यास निश्चितच मालतीबाई यांची मदत झाली होती हे नाकारता येणे शक्य नाही. सुरुवातीच्या काळात र.धों. लेखन प्रपंचातून संततिनियमनाचा विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न करत होते. पुढे ते संतती प्रतिबंधात्मक उपाय व साधने या विषयावरचे ज्ञान मिळवून त्यांनी ती साधने परदेशातून मागवली. यासंदर्भात त्यांच्या शिष्या शकुंतलाबाई परांजपे म्हणतात, 'ह्या विषयावरची सर्व पुस्तके वाचून आणि साधनांचा अभ्यास करून स्वारीने परदेशातून ती साधने आणवली व आपल्या राहत्या घरीच लोकांना साधने बसवून देण्याचा उपक्रम सुरु केला. साधने बसविण्याचेही सर्व ज्ञान त्याला पुस्तकातील चित्रांच्या व मॉडेल्सच्या सहाय्याने वेचून काढावे लागले व स्वत:च स्वत:ला शिकवावे लागले. त्याने बायकोलाही ही विद्या शिकविली व आपल्या राहत्या बि-हाडातच केंद्र चालू केले.' (सामंत बाळ:२०१२:३१)मालतीबाईंनाही सामाजिक स्थितीची आणि तत्कालात चालू असलेल्या स्त्री सुधारणा चळवळीची जाणीव असल्याने त्यांनीही या कामी स्वत:ला वाहून घेतले होते.

र.धोनी चालवलेले कार्य आणि त्यांचे विचार यासंबंधी मालतीबाई त्यांच्याशी एकरूप झाल्या होत्या. त्याचे एक उदाहरण म्हणजे त्यांनी दोघांनीही स्वत:ला आपत्यप्राप्ती होऊ दिली नाही. या आपत्यप्राप्तीच्या निर्णयासंदर्भात रधो.समाजस्वास्थ मासिकात एके ठिकाणी लिहितात की, 'आम्हा दोघांसही पुत्रप्राप्तीची आतुरता कधीच नव्हती. कित्येकांना धार्मिक कारणाकरिता पुत्र पाहिजे असतो. कित्येकांना वारस पाहिजे असतो. आम्हा दोघांपैकी कोणीच धार्मिक नव्हते व मिळकतच नसल्यामुळे वारसाला काय मिळणार? पुष्कळ स्त्रियांना निसर्गात: अपत्यांची इच्छा असलीच तर टी आगंतुक कारणामुळेच असते. त्यातून आमची आर्थिक परिस्थिती कधीच विशेष चांगली नव्हती.' (कर्वे र.धों.:१९३७:२७९) ही सर्व परिस्थिती मालतीबाई यांना अर्थातच माहित होती. यामुळे त्याही र.धों.च्या या विचारस एकरूप होऊनच आपत्यप्राप्ती होऊ दिली नाही. र.धों.नी तर संततिनियमन कार्याला एकरूप होण्यासाठी आणि केवळ इतरांना ज्ञान देण्याएवजी स्वत: आधी त्याचा स्वीकार करावा या हेतूने त्यांनी स्वत:वर



Scanned by CamScanner

संततीप्रतिबंधात्मक शस्त्रक्रिया मालतीबाईच्या संमतीने करवून घेतली. या शास्त्रक्रीयेलाही मालतीबाईचा पूर्ण पाठींबा होता.

र.धों.यांना भारतात बिकट आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत असल्यामुळे ते इ.स. १९२६ मध्ये आफ्रिकेत नैरोबी येथे असलेल्या आपले बंधू शंकरराव कर्वे यांच्याकडे गेले असताना त्यांनी स्वत:वर संततीप्रतिबंधात्मक शस्त्रक्रिया करवून घेतली.या संदर्भातील आठवण सांगताना शंकरराव कर्वे म्हणतात की, 'मीच ती शस्त्रक्रिया केली. १९२६ साली विल्सन कॉलेजातील नोकरी सोडल्यावर तो आफ्रिकेत माझ्याकडे नोकरीच्या शोधात आला होता. त्यावेळी त्याचे वय ४४ वर्षाच होतं. वय बरच वाढलेलं, नोकरी नाही अन गंगुची प्रकृतीही ठीक नाही. म्हणून शस्त्रक्रिया करून घ्यायची त्याची इच्छा होती. पण मुंबईला कुणीही डॉक्टर शस्त्रक्रिया करायला तयार नाही. असे तो म्हणाला, तेंव्हा मीच ती शस्त्रक्रिया करायची ठरवलं आणि माझे मित्र डॉ. सोराबजी यांच्या सहाय्याने केलीही.'(देशमुख अनंत:२०१०:८७) ही शस्त्रक्रिया करण्यापाठीमागे आणखीही कारणे होती ती म्हणजे ते स्वत: संततिनियमनाचा प्रचार करत असल्याने आपल्या कृतीतून तो आदर्श त्यांना निर्माण करावयाचा होता. शिवाय पत्नी मालतीबाई यांची तब्येत सातत्याने खालावत होती त्यामुळे त्यांच्या काळजीपोटीही त्यांनी हा निर्णय घेतला होता. शिवाय या निर्णयाला स्वत: मालतीबाईंनी पाठींबा दिला होता.  मालतीबाई यांची र.धों.च्या शस्त्रक्रियेला पाठींबा होता का या प्रश्नाला उत्तर देताना शंकरराव पुढे म्हणतात की, 'हो, गंगू अप्पाशी पूर्णपणे समरस झाली होती. मोठं सुखी जोडपं होतं ते गंगुने आप्पाला त्याच्या कार्यात अखेरपर्यंत साथ दिली. (देशमुख अनंत:२०१०:८७) या अर्थाने मालतीबाई आणि र.धों. आपल्या विचार कार्य व कृतीमध्ये एकरूप झाले होते. र.धोंच्या प्रारंभीच्या काळात अनंत आर्थिक अडचणी असताना त्यांनी मालतीबाईंनी नोकरी करून रधोना संततिनियमन कार्यात मोठा आधार दिला होता. आजारपणाने घरी असताना, चालता येत नसताना हातात कुबड्या घेऊन रधोंच्या कार्याला नियमितपणे सहकार्य केले होते.

इ.स. १९२८ पासून मालतीबाई आजाराने त्रस्त होत्या. आजारपणामुळे त्यांचे दोन्ही पाय निकामी झाले होते. तेंव्हा त्या कुबड्यांचा आधार घेऊन घरात र.धों.ना त्यांच्या कार्यात मदत करीतच होत्या. परंतु दुर्दैवाने त्या आजारपणातून उठू शकल्या नाहीत. त्यातच त्यांचा इ.स. १९४४ मध्ये दुर्दैवी मृत्यू झाला. र.धों. आपल्या पत्नी, जीवन सहचारिणी, आयुष्याच्या जोडीदारास कायमचे पारखे झाले. त्यापेक्षाही अधिकची हानी दोघांनी सुरु केलेल्या संततिनियमन चळवळीची झाली. संततिनियमन चळवळीतील पहिल्या शिलेदाराम्र र.धों. पारखे झाले. तरीही त्याच जिद्दीने हा आघात सहन करून र.धों. शेवटच्या श्वासापर्यंत आपल्या विचार आणि कार्याचा प्रचार करीतच राहिले. मालतीबाई यांचा मृत्यू झाल्यानंतरही त्यांच्यावर होणारे विरोधकांचे हल्ले थांबले नाहीत. एखाद्या शत्रूच्या मृत्युनंतर त्याच्या दुर्गुनांचीही चर्चा होऊ नये असा समज असणा-या या संस्कृतीतील सनातन्यांनी मात्र संस्कृतीच्या मर्यादा ओलांडून मालतीबाईच्या मृत्यूसंदर्भात नाना प्रकारच्या वावड्या उठवायला सुरुवात केली. र. धो.नी संततीनियमनाचे आपल्या पत्नीवर अतिप्रयोग केल्यामुळेच त्यांचा याप्रकारे मृत्यू झाला अशा प्रकारचे आरोप त्यांच्यावर होऊ लागले.

अशा संततिनियमन चळवळीला विरोध करणा-या विकृत मनोवृत्तीला र.धों.नी तेंव्हढ्याच संयमाने व बुद्धिप्रामाण्यावादी दृष्टीने सामाजस्वास्थ्यातून उत्तर दिताना लिहिले की, आमचे पत्नीस झालेल्या रोगाला 'पर्निशियस अनेमिया' म्हणतात. डॉक्टरांना तो वेळीच ओळखता न आल्याने भरमसाठ उपचारांनी तो बरा न होता, वाढतच गेला. या रोगाचा आणि संततिनियमनाचा संबंध असलाच तर तो इतकाच आहे की, हा रोग गरोदर स्त्रियांनाच विशेषकरून होतो. तेंव्हा संततीनियमनाचे उपाय वापरले नसते तर कदाचित पहिल्याच गरोदरपणात तिची गच्छंती झाली असती. तेंव्हा संततीनियमांचे साधनांनी आमचे पत्नीचे बाबतीत जर आम्ही काही केले असेल तर रोगापासून



Scanned by CamScanner

बचावाचे काम केले आहे. रोग उत्पन्न करण्याचे नव्हे.'(देशमुख अनंत:२०१०:८७)हे र.धो.नी अत्यंत शास्त्रीय ज्ञानावर आधारित दिलेले अभ्यासू उत्तर म्हणजे केवळ विरोधासाठी म्हणून मालतीबाईंच्या मृत्यूमुळे संततिनियमन चळवळ अडचणीत आणू पाहणा-या प्रतिगामी सनातनी मंडळीच्या कानाखाली लागावलेली जणू चपराक होती. र.धो.नी असे अनेक आरोप सहन करून ही चळवळ हयातभर चालवली. या चळवळीच्या उभारणीत त्यांच्या सोबत आयुष्य वेचण-या मालतीबाई यांचेही योगदान समजून घेण्यासाठी तत्कालात त्यांना सहन करावे लागलेले आरोप, त्यांच्यावर झालेल्या टीका समजावून घेणे अतिशय महत्वाचे आहे.

सारांशत:, र.धो.च्या संततिनियमन विचार व कार्यास सुरुवातीच्या काळात विरोध होत असतानाही मालतीबाईंनी आपल्या पतीने सुरु केलेल्या या कार्याचे महत्व जाणले होते. म्हणूनच त्यांनी अनंत अडचणी येत असताना अत्यंत खंबीरपणे र.धों.च्या या चळवळीत मोलाची साथ दिली. याबद्दल र.धों.चे बंधू शंकरराव कर्वे यांनी 'हे जोडपं या कार्यात समरूप झाले होते' असे म्हंटले होते. तर मालतीबाईंचे सुधारक सासरे महर्षी कर्वे यांनीही मालतीबाईंच्या सुधारणावादी कार्याचे कौतुकच केले होते. परंतु ज्या कार्यामुळे र.धों.ना हयातभर आणि मृत्युनंतरही उपेक्षितच राहावे लागले त्या कार्यात एका स्त्रीचे योगदान चर्चिले जाने अशक्यच होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वावर त्यांनी र.धों.च्या संततिनियमन चळवळीत पहिल्या शिलेदार म्हणून केलेले कार्य फारसे पुढे आलेच नाही. तरी परंतु त्यांनी तत्कालीन प्रतिकूल परिस्थितीत केलेल्या कार्याचे मोल कमी होत नाही.कारण त्यांनी चालवलेली हीतत्कालीन परिस्थितीत नवीन आणि काळाच्या पुढे जाणारी होती. त्यामुळे त्यांचे हे कार्य र.धों प्रमाणेच उपेक्षित राहिले. अलीकडच्या काळातील स्वत:ला स्त्रीवादी म्हणवणा-या स्त्रीवाद्यांनी मालतीबाईंनी केलेल्या कार्याकडे या दृष्टीने पहिले तर कदाचित कर्वे कुटुंबातील त्यांच्या समकालीन स्त्रियांना त्यांच्या कार्याबद्दल जो सन्मान प्राप्त झाला त्या तुलनेत मालतीबाईंचे हे कार्य आणि त्यांनी दिलेले योगदान कितीतरी पटीने श्रेष्ठ ठरते. परंतु त्यांची आणि त्यांनी स्वीकारलेल्या कार्याची मात्र त्यांच्या हयातीत आणि नंतरही उपेक्षाच झाली. ही उपेक्षा थांबून त्यांनी दिलेले हे योगदान महाराष्ट्रालाच नव्हे तर सबंध देशाला आधुनिक दृष्टी देणारी होते, हे मान्य करावेच लागते.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

१.आठलेकर मंगला, महर्षी ते गौरी, राजहंस प्रकाशन,पुणे,१९९९.
२.कर्वे धों.के. व पटवर्धन ना. म., आत्मवृत्त व चरित्र, हिंगणे स्त्री शिक्षण संस्था, पुणे, १९५८.
३.कर्वे र. धों.(संपा), समाजस्वास्थ्य, वर्ष २२, अंक १२, जून १९४९.
४.कर्वे र. धों., संततिनियमन: आचार व विचार,प्रकाशक शकुंतला परांजपे,पुणे, १९५९.
५.कर्वे र. धों.(संपा), समाजस्वास्थ्य मासिकातील निवडक लेख,भाग-२,राईट एजन्सी गिरगाव, मुंबई, १९३३.
६.देशमुख अनंत, समाजस्वास्थकार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१०.
७.देशमुख अनंत(संपा.), र.धों.कर्वे मते आणि मतांतरे, पद्मगंधा प्रकाशन, पुणे,२०१०.
८.परांजपे. शकुंतला, काही अंबट काही गोड, श्रीविद्या प्रकाशन पुणे, १९८८.
९.फडके य. दि., र. धों.कर्वे, ह.वि.मोटे प्रकाशन, मुंबई, १९८१.
१०.सामंत बाळ (संपा.), आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, लोकवाङ्मय गृह, मुंबई,२०१२.



Scanned by CamScanner